ePaper

मुंबई पोलिसांना सॅल्यूट! महिनाभरात 487 बेपत्ता मुलांचा शोध



| वर्ष - 6 । अंक - 201 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- पुण्यात खाद्य-खरेदीची धम्माल
- बैलगाडा शर्यतचा आता अंतिम लढा!
- कार्तिकी यात्रेसाठी पंढरपुरात लाखो भाविकांची मांदियाळी

www.mahaenews.com | ।शुक्रवार।दिनांक 4 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चला 'स्वच्छता चॅम्पियन' बनुया !

## आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन : सर्व घटकांतील नागरिकांनी सहभागी व्हा


**। पिंपरी ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये देशात पिंपरी चिंचवड शहर अव्वल स्थानावर यावे यासाठी महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. या अभियानामध्ये सर्व घटकांतील नागरिकांचा व्यापक सहभाग वाढविणे तसेच माहिती, शिक्षण आणि संवादाद्वारे वर्तनामध्ये बदल घडविण्याच्या दृष्टीने जनजागृती करणे हा स्वच्छ सर्वेक्षणाचा हेतू आहे. या उपक्रमांतर्गत स्वच्छतेबाबत उत्कृष्ट कामकाज करणाऱ्या सहभागी नागरिक, नागरिकांचा गट, सीएसआर प्रतिनिधी, स्वयंसेवक आणि बचतगट यांना 'स्वच्छता चॅम्पिअन्स' म्हणून महापालिकेच्या वतीने गौरविण्यात येणार आहे.**

या अभियानामध्ये नागरिक तसेच समाजातील सर्व घटकांनी व्यापक स्वरुपात सहभाग घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड शहराला देशातील सर्वात सुंदर व स्वच्छ शहर म्हणून एक वेगळी ओळख निर्माण करण्याच्या दृष्टीने महापालिकेची वाटचाल सुरु आहे. त्यासाठी महापालिकेच्या वतीने अनेक उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमांमध्ये शहरातील नागरिकांचा प्रतिसाद उत्तम असून ते मोठ्या संख्येने सहभागी होतात. स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये पिंपरी चिंचवड शहराने सहभाग घेतला




आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड शहर अव्वल स्थानावर यावे यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. 'स्वच्छता चॅम्पिअन्स' या उपक्रमांतर्गत स्वच्छतेबाबत उत्कृष्ट कामकाज करणाऱ्या नागरिक, नागरिकांच्या गटाला, सीएसआर प्रतिनिधी, स्वयंसेवक आणि बचतगट यांना महापालिकेच्या वतीने 'स्वच्छता चॅम्पिअन्स' म्हणून गौरविण्यात येणार आहे.

स्वच्छता चॅम्पिअन्स' या उपक्रमात सहभागी होण्या-या नागरिकांचे वय १८ किंवा त्यापेक्षा अधिक असावे. या उपक्रमात सहभागी नागरिक किंवा नागरिकांचा गट पिंपरी चिंचवड शहरातील रहिवासी असावा. तसेच त्यांनी केलेले स्वच्छतेविषयक कामकाज हे पिंपरी चिंचवड शहरातील कार्यक्षेत्रात केलेले असावे.

> **उपक्रमात सहभागी झालेल्या नागरिक किंवा नागरिकांच्या गटाने "स्वच्छता चॅम्पिअन्स" असा विषय नमुद करुन आपण केलेल्या स्वच्छता विषयक (आयईसी, ३ आर प्रिन्सिपल,कचऱ्यापासून खतनिर्मिती, वृक्षारोपण, कचऱ्यापासून विविध वस्तू तयार करणे, पुनर्वापर, टाकाऊपासून टिकाऊ आदी.) उत्कृष्ट कार्याचे किमान ५० शब्दांत माहिती देणे आवश्यक आहे. व्यक्तीचे किंवा संस्थेचे नाव, संपर्क क्रमांक, कामकाज करतानाच्या फोटोसहीत SBM2020@PCMCINDIA.GOV.IN यावर ११ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी २ पर्यंत पाठवावी. त्यानंतर आलेली नोंदणी ग्राह्य धरली जाणार नाही.**
>
> **-विनोद जळक,**
> स्वच्छ भारत समन्वयक
> तथा सहायक आयुक्त.

महापालिकेच्या वतीने १० महिला व १० पुरुष यांची स्वच्छता चॅम्पिअन्स करीता निवड करण्यात येणार आहे. त्यांना कोणत्याही स्वरूपाचे रोख बक्षीस देण्यात नसून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येणार आहे. शहरातील नागरिक, नागरिकांचे गट, सीएसआर प्रतिनिधी स्वयंसेवक,बचतगट यांनी जास्तीत जास्त संख्येने 'स्वच्छता चॅम्पीअन्स'मध्ये सहभागी व्हावे,असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या कार्यभारात बदल!

## आयुक्तांचा निर्णय : प्रशासकीय गतीमानतेसाठी प्रयत्न

**। पिंपरी ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील उपआयुक्त आणि सहायक आयुक्त संवर्गातील अधिकाऱ्यांच्या कार्यभारात बदल करण्यात आला असून त्यांच्याकडे आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतंत्र आदेशाद्वारे नव्याने कार्यभार सोपविले आहेत.

महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानुसार, उपआयुक्त विठ्ठल जोशी यांच्याकडे यापूर्वी दक्षता व गुणनियंत्रण (प्रशासकीय व तांत्रिक बाबींसह), माहिती व तंत्रज्ञान, नागरी सुविधा केंद्र आणि क्रीडा या विभागांची जबाबदारी देण्यात आली होती. आता त्यांच्याकडे सामान्य प्रशासन, दक्षता व गुणनियंत्रण (प्रशासकीय व तांत्रिक बाबींसह) या विभागांची जबाबदारी सोपविण्यात



आली आहे. तसेच उपआयुक्त जोशी हे सर्व विभागांकरीता समन्वयक म्हणून कामकाज पाहणार आहेत. त्यांची आस्थापना सामान्य प्रशासन विभागात असणार आहे. तसेच सहायक आयुक्त बाळासाहेब

> **प्रशाकीय गतीमानता आणि कार्यक्षमता वृद्धीच्या दृष्टीने अधिकाऱ्यांच्या कार्यभारामध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. या आदेशाची अंमलबजावणी ३ नोव्हेंबर २०२२ पासून करण्यात येत आहे.**
>
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

खांडेकर यांच्याकडे यापूर्वी निवडणूक व जनगणना (आधार कार्ड योजना) आणि प्रशासन विभागाचे कामकाज सोपविण्यात आले होते. आता त्यांच्याकडे क्रीडा, माहिती व तंत्रज्ञान, नागरी सुविधा केंद्र (आधार कार्ड योजना), निवडणूक व जनगणना या विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांची आस्थापना क्रीडा विभागात राहील. याबाबत स्वतंत्र आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी निर्गमित केले आहेत.

# पुण्यात खाद्य-खरेदीची धम्माल!

## नागरिकांची पसंती : पुण्यात "विंटर शॉपिंग अँड फूड फेस्टिवलचे आयोजन






।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिवाळा म्हटला की वर्षभर जी गोष्ट कपाटाच्या ठेवली असते ती बाहेर निघते ते म्हणजे स्वेटर आणि मफलर. लोकरीचे मऊ आणि उबदार स्वेटर थंडीत खूपच कामी येते. तीनही ऋतू हे समसमान असल्यामुळे सर्वच ऋतूंचा अनुभव येथे अनुभवायला मिळतो. या ऋतूमध्ये सर्वांना आवडणारा ऋतू म्हणजे हिवाळा. हिवाळा हा थंडीचा काळ. साधारण ऑक्टोबर हिट संपल्यानंतर हळूहळू थंडीची चाहूल लागते. अशाच गुलाबी थंडीत या परिसरातील लोकांच्या रोजच्या जीवनातील गरज लक्षात घेऊन बाणेर-बालेवाडीकारणांसाठी खास "विंटर शॉपिंग अँड फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आयोजन करण्यात आले आहे.**

लहू बालवाडकर यांच्या सहयोगाने पुण्यात "विंटर शॉपिंग अँड फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. हा फेस्टिव्हल बालवाडी येथील, दसरा चौकातील, आठवडे बाजार ग्राउंडवर सर्वांसाठी खुला राहणार आहे. बाणेर-बालेवाडीकरांना मनसोक्त खरेदी आणि लज्जतदार पदार्थांची मेजवानी एकाच छताखाली आणि तेही दोन दिवस मिळणार आहे. सकाळी ११ ते रात्री ९.३० पर्यंत हा फेस्टिव्हल सुरू राहील.

या "विंटर शॉपिंग अँड फूड फेस्टिवलमध्ये एकाच छताखाली सर्वांना आवडणाऱ्या आणि परवडणाऱ्या वस्तू आपणास खरेदी करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने बनारसी साड्या, चंदेरी साड्या, कांजीवरम, पैठणी, दिवाळीच्या शोभेच्या वस्तू, ज्वेलरी, पंजाबी सूट्स, प्लाझो, फाब्रिक डिझाईनर साड्या, रेडी टू वेअर ब्लाऊज, कॉटन मेन्स शर्ट्स आणि किड्स वेअर, सुगंधी हॅन्डमेड सोप, ब्युटी प्रॉडक्ट्स, खान्देशी केळीचे वेफर्स, शेंगदाणा गुळपट्टी, शोभेच्या वस्तू, सोलापुरी चादर, महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तू, लोणच्यांचे विविध प्रकार, दर्जेदार गावरान आणि घरगूती मसाले, पापड कुर्डाई, शोभेच्या वस्तू, रेडी टू कुक फूड्स, मातीची भांडी, बेडशीट असे स्टॉल असणार आहेत.

आपणही या शॉपिंग अँड फूड फेस्टिवल मध्ये सहभागी होऊन आपला व्यवसाय बावधन परिसर वाढवू शकता. या परिसरातील लोक मोठ्या संख्येने या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलला भेट देत असतात. या मध्ये स्टॉल हवा असल्यास ९८५०३०४१६६ या नंबर वर संपर्क करावा. या माध्यमातून नक्कीच आपल्या व्यवसायाला बाणेर-बालेवाडी परिसरातून चालना मिळेल.

### उद्योजकांसाठी आणि व्यावसायिकांसाठी बिजनेस प्रोमोट करण्याची सुवर्णसंधी

हिंजवडी आय. टी. जवळील बाणेर बालेवाडी परिसर आय. टी. रेसिडेन्स हब म्हणून झपाट्याने विकसित झाला आहे.

आजच्या डिजिटल युगात घरातील किराणा सामना पासून पासून ते गोळ्या-औषधे सर्व ऑनलाईन पद्धतीने मोठे मोठे उद्योग व्यावसायिक लोकांना हव्या त्या वस्तू त्यांच्या दारापर्यंत पोहोच करत आहेत. या परिसरातील लोकांच्या रोजच्या जीवनातील गरज लक्षात घेऊन बाणेर-बालेवाडीकारणांसाठी खास "विंटर शॉपिंग अँड फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिवलच्या माध्यमातून व्यावसायिकांसाठी बाणेर-बालेवाडी परिसरात बिझिनेझ प्रोमोट करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

आपणही आपला बिझनेस बाणेर-बालेवाडीकरांपर्यंत या फेस्टिवलच्या माध्यमातून पोहचवू शकता. तसेच या पुढेही ऑनलाईन सेवा देऊन आपल्या व्यवसायास चालना मिळणार हे नक्की. तर आजच आपला स्टॉल बुक करा.

### लहान मुलांसाठी खास आकर्षण

**लहान मुलांना खेळण्यांचे प्रचंड आकर्षण असते. काळाप्रमाणे खेळणीही बदलली. अलीकडच्या काळात रोबोटसारखी स्मार्ट खेळणी मुलांच्या भावविश्वात प्रवेश करू लागली आहे. कोरोनाकाळात ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांचा मोबाईलवर जास्त वेळ जात आहे. त्यामुळे अशा तांत्रिक खेळण्यांसोबत मुलांनाही कनेक्ट करण्यावर पालकांचाही जोर आहे. त्यातून नवीन काहीतरी शिकायला मिळेल, अशी पालकांची अपेक्षा असते. मात्र, यासोबत धोकाही घरात येत आहे. हेच लक्षात घेऊन आजच्या धावपळीच्या, धकाधकीच्या जीवनात आपल्या मुलांबरोबर वेळ घालवण्यासाठी तसेच त्यांच्या कुतूहलाचा विषय म्हणून लहान मुलांसाठी खास आकर्षण असणारे लांब पायाचे स्टिल्ट वॉकर आणि जोकर आपल्या करामती दाखवून लहान मुलांचे मनोरंजन करणार आहेत. त्याच बरोबर या बच्चे कंपनीसाठी करमणुकीसाठी तसेच जम्पिंग आणि किड्स बॉऊन्सिंग ही खेळण्यासाठी उपलब्ध असणार आहे.**

## भारत जोडो यात्रेच्या समर्थनार्थ काँग्रेसची मोटारसायकल रॅली

। पुणे। महाईन्यूज ।



भारत जोडो यात्रेच्या समर्थनार्थ काँग्रेसकडून गुरुवारी पुण्यात मोटारसायकल रॅली आयोजित करण्यात आली होती. भारत जोडो यात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, असे माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांनी सांगितले. शिवसेनेने तेही यामध्ये सहभागी झाले होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा सुरू केली आहे. ही यात्रा येत्या काही दिवसांत राज्यात दाखल होणार आहे. या पार्श्वभूमीवर यात्रेच्या जनजागृतीसाठी मोटारसायकल रॅली काढण्याचे नियोजित होते. त्यानुसार कोथरूड येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून मोटारसायकल रॅलीला प्रारंभ झाला. आगाखान पॅलेस येथे रॅलीचा समारोप झाला. काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्यासह भारत जोडो यात्रेचे जिल्हा समन्वयक अॅड. अभय छाजेड, माजी मंत्री रमेश बागवे, शिवसेनेचे माजी आमदार चंद्रकांत मोकाटे, प्रशांत बधे, राष्ट्रवादी काँग्रेसचे दिपक मानकर, शुक्राचार्य वांजळे, कमल व्यवहारे, दिप्ती चवधरी, दत्ता बहिरट, बाळासाहेब दाभेकर, संगीता तिवारी, पुजा आनंद यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

राहुल गांधी यांची यात्रा कन्याकुमार ते काश्मिर अशी आहे.

## अजित पवारांना ७० हजार कोटींच्या कथित घोटाळ्यात बदनाम केले, जयंत पाटील यांचे मत

।पुणे । महाईन्यूज ।



महाराष्ट्रात लाखो हेक्टर जमीन सिंचनाद्वारे ओलिताखाली आणून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना चांगले दिवस दाखविण्याचे काम अजित पवार यांनी जलसंपदामंत्री या नात्याने केले. सिंचन विभागातील ७० हजार कोटींच्या कथित घोटाळ्यात अजित पवार यांना नाहक बदनाम करण्यात आले. आरोप झाले यापेक्षाही काम किती झाले हे महत्त्वाचे आहे. सिंचन क्षेत्रात अजित पवार यांनी केलेले काम मोलाचे आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी गुरुवारी काढले. पुरंदर पब्लिसिटीतर्फे 'कार्यक्षम नेतृत्व महाराष्ट्राचे : अजितदादा पवार' या कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी पाटील बोलत होते. खासदार श्रीनिवास पाटील, माजी केंद्रीयमंत्री विजय नवल पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार, माजी खासदार अशोक मोहोळ, राष्ट्रवादीचे प्रवक्ते अंकुश काकडे, शहराध्यक्ष प्रशांत जगताप, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, माजी आमदार अशोक टेकवडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष उमेश पाटील आणि पुरंदर पब्लिसिटीचे विजय कोलते या वेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, वेळेचे नियोजन आणि स्पष्टवक्तेपणा हे दादांचे गुण आहेत. काम होणार नसेल तर ते परखडपणे सांगतात. १९९० पासून सात निवडणुकांमध्ये मी, अजितदादा, दिलीप वळसे पाटील एकत्र काम करत आहोत. आम्ही सत्तेत असताना माझ्याकडे अर्थमंत्री आणि अजित पवारांकडे कृष्णा खोरे प्रकल्पाची जबाबदारी देण्यात आली होती. त्यावेळी सरकारची आर्थिक परिस्थिती अतिशय हालाखीची होती.

# बैलगाडा शर्यतचा आता अंतिम लढा!

## दि. 29 नोव्हेंबर रोजी सुनावणी : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे लक्ष

पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**सर्वोच्च न्यायालयात बैलगाडा शर्यतीच्या अंतिम सुनावणीसाठी राज्य सरकारच्या वतीने तयारी करण्यासाठी आयुक्त दर्जाचा अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल. तसेच, सुनावणीचा सर्व खर्च पशू संवर्धन विभागाकडून करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे पशू संवर्धन व दूग्ध व्यावसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केली आहे.**

बैलगाडा शर्यतींवर बंदी पूर्णत: उठवण्याबाबत दाखल केलेल्या याचिकेवर दि. २३ नोव्हेंबर २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयात पाच न्यायाधीशांच्या विस्तारित खंडपीठांसमोर अंतिम सुनावणी होणार आहे. त्याच्या पूर्व तयारीसाठी पुण्यातील विधान भवन येथे पशू संवर्धन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

यावेळी आमदार महेश लांडगे, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जे.पी. गुप्ता, आयुक्त सचिंद्रप्रतापसिंह, अतिरिक्त आयुक्त धनंजय परकाळे, उपायुक्त डॉ. प्रशांत भड, उपायुक्त डॉ. शैलेश केंडे, कुणाल कदम तसेच अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष नितीन शेवाळे, संदीप बोदगे, रामकृष्ण टाकळकर, धनाजी शिंदे, आनंदराव मोहिते, अनिल लांडगे, महेश शेवकरी, बाळासाहेब आरुडे, विजय काळे, अजित गायकवाड , संदीप कुंडकर, आनंद वाडेकर, नवनाथ होले, विकास नाईकवाडी, मारुती वाबळे आदी उपस्थित होते.

दि. ७ मे २०१४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण देशात बंदी घातली होती. त्यानंतर एप्रिल २०१७ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैलगाडा शर्यतीबाबत कायदा केला. परंतु, या कायद्यास काही शर्यत विरोधकांनी न्यायालयात आव्हान दिले होते. संबंधित खटला सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. दि. १६ डिसेंबर २०२१ रोजी काही अटी शर्तीवर न्यायालयाने राज्यात बैलगाडा शर्यतीस परवानगी दिली आहे,त्यानुसार राज्यात शर्यती चालू असल्या तरी अंतिम सुनावणी अद्याप बाकी आहे. ही सुनावणी आता दि. २३ नोव्हेंबर २०२२ पासून सर्वोच्च न्यायलयात सुरू होत आहे.

**■ न्यायालयीन लढ्याच्या तयारीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती**

**■ राज्याचे पशू संवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचा निर्णय**

**■ आमदार महेश लांडगे, अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक**



### राज्य सरकारकडून नामवंत वकीलांची फौज...

**बैलगाडा शर्यतींवरील बंदी उठवण्याबाबत युक्तिवाद करण्यासाठी नामवंत ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मुकुल रोहोतगी, ॲड. शेखर नाफडे, ॲड. तुषार मेहता यांची नेमणूक करावी व या न्यायालयीन केस चा सर्व खर्च महाराष्ट्र शासनाने करावा, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे केली. अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे संदीप बोदगे यांनी बैलगाडा केसची सर्वोच्च न्यायालयातील सद्यस्थिती बाबत माहिती दिली व राज्य शासनाकडून या केस चे पूर्णवेळ कामकाज पाहण्यासाठी प्रमुख अधिकारी यांची नेमणूक करावी अशी मागणी केली होती. त्याला पशू संवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी हिंरवा कंदिल दाखवला.**

> राज्य सरकारने बैलगाडा शर्यतीबाबत कायदा केलेला आहे. याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार महेश लांडगे व अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे महत्वाचे योगदान आहे. सर्वोच्च न्यायालयातील केससाठी नामवंत वकिलांची नेमणूक करण्यात येईल व सर्व खर्च राज्य शासनाचा पशुसंवर्धन विभाग करेल. तसेच, केसच्या तयारीसाठी राज्य शासनाच्या वतीने आयुक्त कार्यालय स्तरावरील अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल.
>
> - **राधाकृष्ण विखे-पाटील,** पशू संवर्धन व दूग्ध व्यावसाय विकास मंत्री.

> सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या खटल्याच्या तयारीसाठी अपेक्षेप्रमाणे राज्य सरकार सहकार्य करीत आहे. आता लम्पी आजाराच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात बैलगाडा शर्यती आयोजित करण्याबाबत नियमावली तयार करावी. तसेच लम्पी नियंत्रणात आणण्यासाठी रक्त तपासणी केली जाते. मात्र, त्याचा अहवाल मिळायला ८ दिवसांचा कालावधी लागतो. याबाबत तात्काळ तोडगा काढण्यात यावा, असे निवेदन पशू संवर्धन मंत्र्यांना दिले आहे. त्यावर राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.
>
> - **महेश लांडगे,** शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# प्रशासन नव्हे, सामान्य प्रशासन विभाग

## पत्रव्यवहारासाठी आवाहन : आयुक्त शेखर सिंह यांचे स्वतंत्र आदेश

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासन विभागाच्या नावात बदल करण्यात आला असून आता प्रशासन विभागाला ‘सामान्य प्रशासन विभाग’ म्हणून संबोधण्यात येणार आहे. याबाबतचा स्वतंत्र आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी निर्गमित केला आहे. प्रशासन विभागाशी होणारा पत्रव्यवहार यापुढे ‘सामान्य प्रशासन विभाग’ या नावाने करण्यात येणार असून नागरिक तसेच पत्रव्यवहार करणाऱ्या संबंधित यंत्रणांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास शासनाच्या नगरविकास विभागाने मान्यता दिली आहे. या शासननिर्णयामध्ये प्रशासन विभागाकरीता सामान्य प्रशासन विभाग असा शब्दोल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम- ४५६(अ) आणि या अधिनियमातील लागू असलेल्या अन्य तरतुदीद्वारे मिळालेल्या शक्तींचा वापर करून, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवा प्रवेश नियम तसेच तत्संबंधात यापूर्वी करण्यात आलेले ठराव व आदेशांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम- ४५७ (३) अंतर्गत महानगरपालिकेतील विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी सुधारित नियमांना दि.१८ फेब्रुवारी २०२० च्या महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ‘पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२०’ करीता मंजुरी देण्यात आली आहे.

या बाबी विचारात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘प्रशासन विभागा’ ऐवजी ‘सामान्य प्रशासन विभाग’ असे संबोधण्यास आणि तशी महानगरपालिका सर्व दप्तरी नोंद करण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतंत्र आदेश निर्गत करून मान्यता दिली आहे. या आदेशाची अंमलबजावणी ३ नोव्हेंबर २०२२ पासून करण्यात येणार आहे.



### नागरिकांना आवाहन...

**दरम्यान, संबंधित आदेश महापालिकेच्या सर्व विभागांना पाठविण्यात आला असून यापुढे अंतर्गत पत्रव्यवहार तथा संपर्कासाठी नव्याने निश्चित करण्यात आलेल्या ‘सामान्य प्रशासन विभाग’ या नावाने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिक तसेच प्रशासकीय कामकाजासाठी पत्रव्यवहार अथवा संपर्क करणाऱ्या यंत्रणांनी झालेल्या नावबदलाची नोंद घ्यावी असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.**

## संपादकीय

# जीवघेणे हिंदोळे

***गुजरातेतील झुलता पुलाच्या दुर्घटनेने पुन्हा एकदा सर्व पातळ्यांवरील ढिसाळपणाचा, बेशिस्तीचा आणि उत्तरदायित्वाच्या अभावाचा प्रश्न प्रकर्षाने समोर आला आहे.***

सव्वाशेहून अधिक व्यक्तींना या दुर्घटनेत जीव गमवावा लागला. त्यांच्या कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाची कल्पना आपण करू शकतो. परंतु हा केवळ अपघात आहे, असे म्हणून आपल्या यंत्रणा जर ढिम्मच राहणार असल्या तर पुन्हापुन्हा असे धक्के बसत असूनही आपण काहीच शिकत नाही, असा त्याचा अर्थ होईल. या भीषण दुर्घटनेनंतर तरी गर्दीचे व्यवस्थापन याबाबत काही गांभीर्याने आपण विचार करणार आहोत की नाही, हाच प्रश्न आता ठळकपणे सामोरा आला आहे. अलीकडे सर्वसाधारणपणे गर्दी नेमकी कोठे जमणार आहे, त्याचा अंदाज केवळ प्रशासनच नव्हे तर सर्वसामान्यांनाही येऊ शकतो. अशा ठिकाणी मग काही नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्ती घडल्यास सुरक्षितरीत्या बाहेर पडण्यासाठी काही वेगळे मार्ग आहेत की नाही, याची काळजी प्रशासनानेच घ्यायला हवी. ती घेतली जात नाही, हे अशा घटनांनंतर कायमच आढळून येते.

वास्तविक आता लोकांना वेळेत आणि अचूक माहिती देण्यासाठी अद्ययावत संपर्कसाधने उपलब्ध आहेत. पण त्यांचा तत्परतेने उपयोग करून घेण्याचे प्रसंगावधान दाखवले जात नाही. दुर्घटना घडल्यानंतर समित्या नेमल्या जातात, त्यांचे अहवाल धूळ खात पडून राहतात आणि एकूण कारभार नि व्यवहार तसाच सुरू राहतो. जीवितहानी झाल्यानंतर किमान संवेदनक्षमताही न दाखवता काही जण दुर्घटनेतही राजकारण साधण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेच काही विरोधकांनी मोदींवर टीका करण्यासाठी हे निमित्त साधले. तर भाजपला बदनाम करण्यासाठी काहींनी हा प्रकार मुद्दामच घडवून आणला, असा सनसनाटी आरोप भाजपचे काही कार्यकर्ते करीत होते. हे सगळे उद्विग्न करणारे वर्तन आहे. तेव्हा राजकारण बाजूला सारून गर्दीचे व्यवस्थापन, प्रतिबंधात्मक उपाययोजना, सार्वजनिक जीवनात पाळावयाची शिस्त या बाबतीत सुधारणा कशा घडविता येतील, हे पाहायला हवे. मच्छू नदीवरील हा पूल १४० वर्षांचा जुनापुराणा झुलता पूल आहे. वयोमानानुसार त्याची देखभाल करणे आवश्यक असल्याने यंदा तो पूल सहा महिने बंद ठेवून, त्याची डागडुजी करण्यात आली. त्यानंतर चारच दिवसांपूर्वी म्हणजे २६ ऑक्टोबर या गुजरात नववर्षदिनी तो लोकांसाठी पुन्हा खुला करून देण्यात आला होता. मोठा गाजावाजा करून त्याचे खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटनही पार पडले. रविवारी या पुलावर मोठी गर्दी झाली. पुलाच्या क्षमतेपेक्षा कितीतरी जास्त म्हणजे तीनशेहून अधिक लोक तिथे जमा झाले होते. तो भार असह्य होऊन पूल कोसळला. मच्छू नदीत अनेकांना जलसमाधी मिळाली.

# माझे बाबा ! ः प्रा.रामकृष्ण मोरे!!



माझी 'फोटोग्राफिक मेमरी' आहे, असे ते सांगत. यशस्वी व्हायचे असेल, तर आपलं नाणं खणखणीत असलं पाहिजे, जगाची काळजी करायची नाही, नेहमी आपल्या कामावर लक्ष केंद्रित करायचे, डोक्यावर नेहमी बर्फ व तोंडात साखर ठेवायला हवी, हाच जीवनाचा मूलमंत्र असायला हवा असे ते सांगत. माझे बाबा खूप साधे होते. कपडे, खाणं-पिणं यामध्ये त्यांची आवड सर्वसाधारण होती. गाव खेड्यातून ते आलेले असल्याने पैशाचे महत्त्व ते जाणून होते. मला दहावीला ८८ टक्के मार्क मिळाले नंतर सायन्स करायचे निश्चित झाले. 'बारावीला तू नक्की 90 टक्क्यांच्या पुढे जाशील? अशी त्यांना खात्री होती आणि झालं ही तसंच... मला बारावीला 93 टक्के मार्क मिळाले.

एमबीबीएस करायचे हा निर्णय झाल्यानंतर वैद्यकीय प्रवेशासाठी माझा धुळे येथे नंबर लागला होता. मात्र, माझ्या अभ्यासावर व प्रकृतीवर लक्ष राहण्यासाठी त्यांनी पिंपरीतील डॉ. डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये पेमेंट सीटमध्ये माझा प्रवेश करून घेतला. मला अभ्यासाबरोबरच बाबांच्या स्वप्नपूर्तीसाठी झटायचे होते. कॉलेजच्या होस्टेलमध्ये राहत असताना 'अभ्यास ,अभ्यास, आणि अभ्यास' या एकाच गोष्टीचा मी ध्यास घेतला होता. परंतु, सततच्या अभ्यासामुळे माझी तब्येत पुढे सारखी बिघडू लागू लागली. हि माहिती त्यांना समजताच ते खूप अस्वस्थ झाले.



'नुसता अभ्यास करायचा नाही, बबड्या....खाणं मजबूत आणि ते देखील हेल्दी असलं पाहिजे, शिवाय विरंगुळा म्हणून टीव्ही बघणं, वृत्तपत्र वाचणं व महिन्यातून एकदा पिक्चर हाणलाच पाहिजे' असे ते मला सांगत. मला प्रोत्साहन देण्यासाठी मग दर आठवड्याला ते मला पत्र लिहीत, तेव्हा ते राज्याचे शिक्षण मंत्री होते ,'बबड्या कशी आहेस? अशी त्यांच्या पत्राची सुरुवात असे, खातेस ना ? काय काय खाल्लं पाहिजे? याचेही ते पत्रातून महत्त्व सांगत. कसलेही टेन्शन घेऊ नको, कोणतेही संकट आलं तर हा बाबा भक्कम आहे, फक्त ताण घेऊ नकोस" असा धीर ते मला पत्रातून देत.

**विशेष - भाग - 2**

**शब्दांकन ः विजय जगताप**

त्यांची सगळी पत्रे मी आजही हृदयातील काळजासारखी जपून ठेवली आहेत. लहानपणापासून मला कधीच ते रागवल्याचे, ओरडल्याचं आठवत नाही. घरी आई प्राध्यापिका व एकेकाळी प्राध्यापकाची नोकरी केलेले बाबा असल्याने शिक्षक या पेशाविषयी त्यांना नेहमी अभिमान वाटत असे.

जीवनाला आकार देण्याचे काम शिक्षकच करत असतो. परंतु, अलीकडे शिक्षकांना गृहित धरण्याच्या प्रकाराबद्दल ते खेद व्यक्त करत. दिवाळी तसेच महिन्याच्या सुट्टीत मी घरी आले की, ते खूप हसत असत. मात्र, कामाचा व्याप त्यांच्यामागे इतका असे की, आमचे बोलणेच व्हायचे नाही, मग ते माझ्या उशीच्या खाली पत्र ठेवून निघून जात. नंतर नंतर तर मला झोपेतून उठल्यानंतर उशी उचलून बघायची सवयच लागली. होस्टेलमध्ये असतानाही बाबांची आठवण झाली तर मी झोपेतून उठले की, उशी उचलून बघत असे. मी हॉस्टेलमध्ये आहे, उशीखाली बाबांचे पत्र नसणार हे माहिती असून देखील माझ्या हातून नकळत अशी कृती घडे. हॉस्टेलमधील माझ्या रूममधील एका मैत्रिणीला एकदा फी भरायला व टिफिनचे बिल द्यायला पैसे नव्हते. बाबांना मी ही गोष्ट सांगायचा अवकाश.....बाबा तिची पण काळजी घेऊ लागले. आज ही मैत्रीण खूप नामवंत फिजिशियन आहे.

टीव्हीवर, पेपरमध्ये त्यांचे भाषण येई. मी त्यांच्या भाषणाची फॅन होते. एकदा चहा पिताना भल्या सकाळी ते मला म्हणाले, "आपण जीवनात नेहमी समाधानी असलं पाहिजे, जीवन हे अपूर्ण असतं म्हणून ते सुंदर असतं. अपूर्णातून पूर्णत्वाकडे जाण्याच्या प्रक्रियेस जीवन म्हणतात, आपल्याकडे काय नाही हे बघायचे नाही तर काय काय आहे हे बघायचं" असं ते सांगत. दरम्यान, त्यावेळी 'कोन बनेगा करोडपती' हा अमिताभ बच्चनचा कार्यक्रम टीव्हीवर नुकताच सुरू झाला होता.

एकदा मी निश्चय केला, 'बाबा... मला अमिताभला भेटायचंय, त्याला पाहायचंय... अशी मी इच्छा व्यक्त केली. चार-पाच वेळा माझ्याकडून सारखा आग्रह झाल्यानंतर एकदा ते मला म्हणाले, 'हे बघ बबड्या...

**-डॉ. स्नेहल मोरे-जाधव, अमेरिका**

# पाण्याचा वायदे बाजार नको!

## वायदे बाजार म्हणजे भविष्यातील सौदे (फ्यूचर आणि डेरिव्हेटिव्ह) करण्याचे ठिकाण.

वस्तूचे दर अस्थिर असतात, त्या वेळी 'फ्यूचर सौदा' करून त्या वस्तूचा भविष्यात करावयाच्या व्यवहाराचा दर निश्चित करता येतो. उदा.- आजच्या दराने एक क्विंटल कांद्याचे बुकिंग केल्यास एक महिन्यानंतर प्रत्यक्षात कांद्याचे दर काहीही असले तरी सौद्यानुसार महिनाभरापूर्वी निर्धारित केलेला दर बंधनकारक असतो. यामुळे बाजारातील अनिश्चितता काही अंशी कमी करून व्यावहारिक निर्णय घेता येतात, जोखीम कमी करता येते. आपल्याकडेही वायदेबाजार आहेच. पण अमेरिकेत समभाग बाजारांसाठी जसे न्यू यॉर्कचे 'वॉल स्ट्रीट' जगात मोठे, तसे शिकागो शहरातील 'शिकागो मर्कटाइल एक्स्चेंज' (सीएमई) कृषी उत्पादने, परकीय चलन, ऊर्जा, व्याजदर, खनिजे, इंधन तेल आणि शेअर्स, स्टॉक निर्देशांक इत्यादींचे फ्यूचर सौदे करण्यासाठी मोठे. आता या कंपनीने पाण्याचे फ्यूचर ट्रेडिंग करण्यासाठी पावले उचलली आहेत. ही वेळ का आली?

हवामान बदलाच्या (क्लायमेट चेंज) पार्श्वभूमीवर स्थळ-काळानुरूप (जिओ-



टेम्पोरल) पाण्याच्या उपलब्धतेबाबत शाश्वती राहिलेली नाही. अतिवृष्टी आणि दुष्काळ यांसारख्या टोकाच्या घटना घडण्याची शक्यता वाढणार असल्याचे अनुमान विविध अभ्यासांतून काढण्यात आले आहे. पाण्याची उपलब्धता अनिश्चित झाली तर कृषी, उद्योग, ऊर्जा, पर्यावरण आणि पिण्यासाठी या सर्वच घटकांच्या मागणीएवढे पाणी पुरवण्यावर मर्यादा येणार. त्यामुळे ज्या वेळी मागणी जास्त आणि पुरवठा कमी अशी परिस्थिती निर्माण होईल त्या वेळी पाण्याच्या किमती अस्थिर होतील. असे झाल्यास पाण्याभोवती असलेले उद्योग आणि सेवा अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडतील. ही समस्या टाळण्यासाठी अमेरिकेत कॅलिफोर्निया राज्यात २०२० पासूनच, पाण्याचे 'फ्यूचर ट्रेडिंग' सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. पण समस्या खरोखरच टळेल का? याच कॅलिफोर्निया राज्यात तापमानात विक्रमी वाढ झाली असून नुकत्याच लागलेल्या वणव्यामुळे मोठ्या प्रमाणात जंगले आणि वस्त्या भस्मसात झाल्या आहेत. त्यामुळे आधीच दुष्काळामुळे त्रासलेल्या या राज्यात भविष्यात पाण्याचे संकट अधिक गहिरे होणार आहे. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरले, प्रशांत महासागराच्या किनाऱ्याला लागून असलेले हे राज्य आकाराने त्या देशात तिसऱ्या क्रमांकावरले.

अमेरिकेतली सर्वाधिक लोकसंख्या असलेले हे राज्य आहेच, पण अधिक लोकसंख्येच्या ५० अमेरिकी शहरांपैकी आठ शहरे याच राज्यात आहेत. येथील सोन्याच्या खाणी, कृषी उत्पादन, हॉलीवूड, सिलिकॉन व्हॅली आणि औद्योगिक क्षेत्राच्या वाढीमुळे या राज्याची भरभराट झाली असून अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत १३ टक्के हिस्सा या राज्याचा आहे. जर हे राज्य स्वतंत्र देश म्हणून विचारात घेतले तर या राज्याची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाली ..

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कार्तिकी यात्रेसाठी पंढरपुरात लाखो भाविकांची मांदियाळी!

## एकादशीला चार लाखांपेक्षा अधिक भाविकांची मांदियाळी

**।सोलापूर। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

कार्तिकी यात्रेसाठी अवघे पंढरपूर लाखो वारकरी आणि भाविकांच्या गर्दीने गजबले आहे. यंदा यात्रेत गुरूवारी अडीच लाख भाविक दाखल झाले असून उद्या कार्तिकी एकादशीला चार लाखांपेक्षा अधिक भाविकांची मांदियाळी होण्याची अपेक्षा आहे. गेल्या चार-पाच दिवसांपासून पंढरपूर भाविक आणि वारक-यांनी फुलून गेले असून सर्व मठ, धर्मशाळा, हॉटेल, लॉजमध्ये भाविकांची गर्दी वाढली आहे. विठ्ठल मंदिर व चंद्रभागा नदी परिसरातील वाळवंट व लगतच्या ६५ एकर मैदानासह सर्व छोटे-मोठे रस्ते गर्दीने गजबजून गेले आहेत. चंद्रभागा वाळवंटासह धर्मशाळा आणि मठामध्ये भजन-कीर्तनाचे कार्यक्रम होत आहेत. टाळ-चिपळ्यांसह सर्वत्र विठ्ठलनामाचा गजर ऐकायला मिळत आहे. सर्वत्र भक्तिचा मळा फुलून गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

कार्तिकी एकादशीनिमित्त महाराष्ट्र शासनातर्फे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पहाटे विठ्ठल मंदिरात महाराष्ट्राच्या आराध्य दैवताची महापूजा होणार आहे. यावेळी फडणवीस यांच्या सोबत सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, फलोत्पादन व रोहयोमंत्री संदीपान भुमरे, आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचीही उपस्थिती राहणार आहे. कार्तिकी यात्रेसाठी महाराष्ट्राच्या विविध दूरवरच्या भागासह शेजारच्या कर्नाटक व अन्य प्रांतांतून भाविक पंढरपुरात दाखल होत आहेत. अनेक छोट्या- मोठ्या गावांतून वारक-यांच्या दिंड्या मजल-दरमजल पायी चालत विठ्ठल दर्शनाची आस मनात बाळगून पंढरपुरात दाखल होत आहेत. रात्रीपर्यंत हजारो दिंड्या पंढरीत पोहोचतील.



यानिमित्ताने भाविक आणि वारक-यांच्या गर्दीचा आकडा आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. भाविकांना विठ्ठल दर्शनाची ओढ लागली असून त्यासाठी दर्शन रांग मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. दर्शन रांगेतून विठ्ठल दर्शनासाठी मंदिरात पोहोचायला १२ ते १४ तासांचा अवधी लागत आहे. दर्शन रांगेत भाविकांसाठी विविध सोयी-सुविधा उपलब्ध होत आहेत.

आषाढी यात्रेनंतर कार्तिकी यात्रा मोठ्या प्रमाणावर भरते. यात्रेचे नियोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या अधिपत्याखाली प्रशासन रात्रंदिवस कार्यरत आहे. यात्रा व्यवस्थापन यशस्वी होण्यासाठी यंत्रणेने कंबर कसली आहे. विठ्ठल मंदिर नयनरम्य विद्युत रोषणाईने सजले आहे. यात्रेसाठी पंढरपुरात येणाऱ्या भाविकांसाठी एसटी महामंडळाने जादा एसटी बसेसची सोय केली असून त्याशिवाय रेल्वे प्रशासनाने विशेष रेल्वेची सोय केली आहे. खासगी वाहनांची रेलचेल वाढली आहे.

---

### पोलीस खात्यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल

# रवींद्र दौंडकर यांचा राष्ट्रपती पुरस्काराने सन्मान

### नातेवाईकांनी व दौंडकर कुटुंबीयांनी पोस्टर लावून केला आनंद व्यक्त

**।मुंबई ।महाईन्यूज ।**

गुन्हेगारांचे कर्दनकाळ कायद्याचा वचक शासनाची शान वर्दीचा मान ठेवणारे. कर्तव्यदक्ष. कर्तव्यशिल. अधिकारी. नवी मुंबई पनवेल. पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक. रवींद्र रंगनाथराव दौंडकर पाटील यांनी कायदा सुव्यवस्था टिकवण्यासाठी पोलीस खात्यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.त्यावेळी महाराष्ट्राचे आराध्य कुलदैवत कुलस्वामिनी यमाई मातेच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या माय भूमीत नातेवाईकांनी व दौंडकर कुटुंबीयांनी पोस्टर लावून आनंद व्यक्त केला.




जगामध्ये काही माणसे जन्माला येतात ती आपल्या व्यक्तीमत्त्वाने व उत्तुंग कर्तृत्वाने समाजात आपली उज्वलं परंपरा उमटवितात जनकल्याणचे कंकण हाती बांधून गोरगरीबांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणारे व समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन गरजवंतांच्या हाकेला ओ देणारे आमचे प्रेरणास्थान आदरणीय. दौंडकर साहेब यांचा राष्ट्रपती पुरस्कार देऊन सन्मानित केल्याबद्दल. कनेरसर गावचे सुपुत्र. रमेश शेठ महादेव दौंडकर. लिलाधर ज्ञानदेव दौंडकर. पंढरीनाथ महादेव दौंडकर. भास्कर हनुमंतराव दौंडकर. काळूराम दशरथ दौंडकर. माजी सैनिक. विष्णू तानाजी दौंडकर पाटील यांनी.

आनंद व्यक्त करून दौंडकर

---

# व्यापाऱ्यास लुटणाऱ्या बोगस प्राप्तीकर अधिकाऱ्यांना अटक

### संशयित आरोपींकडून 17 लाख 60 हजार रुपये जप्त

**।कोल्हापूर ।महाईन्यूज ।**

कोल्हापुरात प्राप्तीकर अधिकारी असल्याचा बहाणा करून व्यापाऱ्याकडील ८० लाख रुपये लूट केल्याप्रकरणी गुरुवारी पोलिसांनी सात संशयितांना अटक केली. सुकुमार हंबीरराव चव्हाण, राहुल बाबुराव मोरबाळे, राहुल अशोक कांबळे, जगतमान बहादुर सावंत, पोपट सर्जेराव चव्हाण, लमकी कैलाली बोनिया, नेपाळ व रमेश करण सोनार अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. अन्य काही आरोपी फरारी आहेत. या लुटीचा मुख्य सूत्रधार संजय शिंदे आहे. त्याचा सांगली जिल्ह्यातील वाळवा येथील व्यापारी धनाजी आनंदा मगर



याच्याशी पूर्वी वाद झाला होता. मगर यास धडा शिकवण्याचे त्याने ठरवले होते. त्याच्याकडील काही कर्मचाऱ्यांना फूस लावून कटात सामील करून घेतले होते. मगर हे १९ ऑक्टोंबर रोजी गांधीनगर येथील व्यापाऱ्याकडे पैसे घेऊन जात असताना दुचाकीवरून आलेल्या चौघांनी अडवून प्राप्तिकर अधिकारी असल्याचे सांगून पैशाची रक्कम हिसकावून नेली होती.

याप्रकरणी शाहूपुरी पोलीस ठाण्यात ८० लाख रुपये लूट झाल्याचा गुन्हा नोंद झाला होता. तथापि हा आकडा फुगवून सांगण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

---

# शीना बोरा अजूनही जिवंत, इंद्राणी मुखर्जीच्या वकिलांचा कोर्टात मोठा दावा

**।मुंबई ।महाईन्यूज ।**

शीना बोरा आजही जिवंत असून राहुल मुखर्जी आणि शीना बोरा २४ एप्रिल २०१२ नंतरही संपर्कात असल्याचा दावा शीना बोरा हत्याकांडातील आरोपी इंद्राणी मुखर्जीच्या वकील रणजीत सांगळे यांनी केला आहे. आज प्रकरणाची सुनावणी पार पडली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. "शीना बोरा आजही जिवंत आहे, असा आमचा दावा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०१२ पर्यंत ते दोघे संपर्कात असल्याचे पुरावे आमच्याकडे आहेत. शीना बोराला भेटणारा शेवटचा व्यक्ती हा राहुल मुखर्जी होता. त्यामुळे ती कुठं आहे, हे राहुल मुखर्जी सांगू शकतो. मात्र, ती जिवंत असल्याचा आमचा दावा", अशी प्रतिक्रिया रणजीत सांगळे यांनी दिली आहे.

"शीना तथाकथीत गायब झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी २५ आणि २६ एप्रिल २०१२ रोजी श्यामवर रॉय आणि राहुल मुखर्जी यांचे दोनवेळा मोबाईवर संभाषण झाले होते. २ मे रोजी सुद्धा त्यांनी संपर्क केला होता. मात्र, याबाबत पोलिसांसमोर किंवा सीबीआयसमोर किंवा कलम १६४ अंतर्गत न्यायालयात दिलेल्या जबाबात त्याने असा कोणताही उल्लेख केला नाही. त्याला त्याबाबत विचारले असता, असे संभाषण झाल्याचे आठवत नसल्याचे त्याने सांगितले", असेही ते म्हणाले.

"शीनाबरोबर लग्न झाल्याचे खोटं विवाह प्रमाणपत्रही राहुलनं बनवल्याचे उलटतपासणीत कोर्टात उघड झाले आहे. याबाबत अनेक पुरावे समोर येत आहेत. मात्र, राहुल उत्तरं द्यायला टाळाटाळ करतो आहे. 'मला माहित नाही, मला आठवत नाही", असे उत्तर तो देत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# इम्रान खानच्या रॅलीत गोळीबार!

## भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केली भूमिका

**। नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या रॅलीवर गोळीबार करण्यात आला होता. यामुळे इम्रान खान यांच्या पायावर गोळी लागली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भर रॅलीत माजी पंतप्रधानांच्या रॅलीत गोळीबार केला जातो ही जागतिक स्तरावरील मोठी घटना आहे. त्यामुळे भारतीय परराष्ट्र मंत्रालयानेही यावर प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तानात घडणाऱ्या सर्व घडामोडींवर आम्ही लक्ष ठेवून आहोत, असं परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं आहे.

पाकिस्तानमध्ये इम्रान खान यांच्यावर हल्ला झाल्याची घटना नुकतीच घडली. या घटनेवर आम्ही नजर ठेवून आहोत. आगामी काळात घडणाऱ्या घडामोडींवरही आमचे लक्ष असेल," असे भारतीय परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते अरिंदम बागची म्हणाले आहेत.

पाकिस्तानात तातडीने निवडणुका घ्यावात अशी मागणी तेहरिक ए इन्साफकडून करण्यात येतेय. याच मागणीसाठी लाहोर ते इस्लामाबादपर्यंत 'हकीकी आझादी मार्च' नावाने महामोर्चा काढण्यात आला होता. उद्या, ४ नोव्हेंबर रोजी हा मोर्चा इस्लामाबाद येथे पोहचणार होता. मात्र, त्याआधीच वझिराबाद येथील जफर अली खान चौकात इम्रान खान यांच्यावर गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात त्यांच्या पायाला जखम झाली आहे.

## 'विरोधक कधीही एकत्र आले तरीही मुकाबल्यासाठी भाजपा समर्थ'

### देवेंद्र फडणवीसांचा दावा

**। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



एकमेकांना नेहमीच पाण्यात पाहणारे, एकमेकांना विरोध करणारे, विचारधारा समान नसणारे विरोधक आमच्या विरोधात किती वेळाही एकत्र आले तरी तरीही त्यांचा समर्थ मुकाबला करण्यास भाजपा नेहमीच खंबीर आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा समाचार घेतला. कार्तिकी एकादशीनिमित्त विठ्ठलाच्या शासकीय महापुजेसाठी फडणवीस गुरूवारी सायंकाळी पंढरपुरात दाखल झाले. त्यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विरोधकांवर हल्ला चढविला. उध्दव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर हे दोघे राजकीय युती करणार असल्याच्या हालचाली होत असल्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर फडणवीस यांनी प्रतिक्रिया नोंदविली. उध्दव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर जेव्हा खरोखर एकत्र येतील, तेव्हा बघू, असे उत्तर फडणवीस यांनी दिले. परंतु एरवी, एकमेकांच्या विरोधात भूमिका घेणारे, भिन्न विचारधारा असणारे, आदर्शमूल्ये वेगळी असणारे विरोधक केवळ आमच्या विरोधात म्हणून एकत्र येतात. मात्र अशा विरोधकांशी मुकाबला करायला भाजपा नेहमीच समर्थ राहिला आहे आणि यापुढेही तेवढ्याच ताकदीने मुकाबला करणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

कार्तिकी एकादशीला विठ्ठलाची शासकीय महापूजा करताना महाराष्ट्र सुखी, सुजलाम् सुफलाम् व्हावा, महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हावा, हेच मागणे विठ्ठलाच्या पायाशी मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंढरपूरचा विकास आराखडा तयार होत असून स्थानिक भौगोलिक, सांस्कृतिक परिस्थितीनुसार विकास आराखडा राबविण्यासाठी शासन कटिबध्द राहणार

## पीएफसंदर्भात खातेधारकांसाठी खुशखबर!

### देशभरातील कोट्यवधी पीएफ खातेथारकांना मोठा दिलासा

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

पीएफ हा खरंतर देशभरातील कोट्यवधी नोकरदार वर्गासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. दर महिन्याला पगारातून वजा होणारी रक्कम आपल्या पीएफ खात्यामध्ये जमा होतेय, याचं समाधान नोकरदार वर्गाला असतं. त्याच भरवशांवर निवृत्तीकाळाची बेगमी या वर्गाकडून केली जात असते. अडी-अडचणीला ही रक्कम हाच या नोकरदार वर्गासाठी मोठा आधार असतो. मात्र, गेल्या काही दिवसांपासून काही पीएफ खातेधारकांमध्ये त्यांच्या खात्यातील रकमेसंदर्भात मोठा संभ्रम निर्माण झाला होता. यासंदर्भात ईपीएफओनं आपल्या अधिकृत ट्विटर हँडलवरून स्पष्टीकरण दिलं असून त्यामुळे देशभरातील कोट्यवधी पीएफ खातेथारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून ईपीएफओच्या अधिकृत ट्विटर हँडलवर पीएफ खातेधारकांकडून व्याजदरासंदर्भात विचारणा केली जात आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठीचं व्याज अद्याप पीएफ खात्यांमध्ये जमा करण्यात आलेलं नसल्याची तक्रार खातेधारकांकडून केली जात आहे. केंद्र सरकारने या आर्थिक वर्षासाठी ८.१ टक्के इतका व्याजदर पीएफच्या रकमेवर निश्चित केला आहे. सामान्यपणे केंद्र सरकारकडून व्याजदर निश्चित झाल्यानंतर तो पीएफ खातेधारकांच्या खात्यात जमा करायला सुरुवात केली जाते. यंदा मात्र या आर्थिक वर्षाच्या व्याजाची रक्कम अद्याप अनेक खात्यांमध्ये जमाच केलेली नसल्यामुळे खातेधारकांमध्ये घबराट पसरली होती. यासंदर्भात ईपीएफओच्या ट्विटर हँडलवर काही खातेधारकांनी विचारणा केली असता त्यावर ईपीएफओकडून खुलासेवजा स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. "प्रिय ईपीएफओ, माझं व्याज कुठे आहे? पंतप्रधान नरेंद्र मोदींना सुधारणा हव्या आहेत. मग नोकरशाहीच्या अकार्यक्षमतेचा भुर्दंड सामान्य नागरिकांनी का म्हणून भोगावा?" असा सवाल एका ट्विटर युजरनं विचारला होता. त्यावर ईपीएफओकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.




### लवकरच खात्यामध्ये रक्कम दिसणार

**"ईपीएफओकडून व्याजाची रक्कम खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. लवकरच ही रक्कम तुमच्या खात्यांमध्ये दिसू लागेल. जेव्हा केव्हा ही रक्कम जमा केली जाईल, तेव्हा ती पूर्ण रक्कम जमा होईल. कोणत्याही स्वरूपात या रकमेत कपात केली जाणार नाही", असंही ईपीएफओकडून एका ट्विटर युजरला उत्तरादाखल सांगण्यात आलं आहे.**

"कोणत्याही खातेधारकाचं व्याज व्यपगत झालेलं नाही. सर्व खातेधारकांच्या खात्यांमध्ये व्याजाची रक्कम जमा केली जात आहे. ईपीएफओच्या सॉफ्टवेअरमध्ये काही तांत्रिक बदल केले जात असल्यामुळे खातेदारांच्या अकाऊंट स्टेटमेंटमध्ये ही रक्कम जमा झाल्याचं दिसत नाही", असं ईपीएफओकडून सांगण्यात आलं आहे. सेटलमेंट करणाऱ्या खातेधारकांनाही मिळणार व्याज

दरम्यान, जे खातेदार या काळात सेटलमेंटसाठी अर्ज करत आहेत त्यांनाही स्टेटमेंटमध्ये न दिसणारी ही व्याजाची रक्कम मिळूनच एकूण रक्कम दिली जात आहे,असंही ईपीएफओकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

## उत्तर कोरियाने पुन्हा डागले बॅलेस्टिक क्षेपणास्त्र, जपानमध्ये आणीबाणीचा इशारा

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

उत्तर कोरियाने केलेल्या संशयित बॅलेस्टिक क्षेपणास्त्राच्या पार्श्वभूमीवर जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने आपत्कालीन इशारा जारी केला आहे. उत्तर कोरियाने एक क्षेपणास्त्र डागले जे जपानवरून पॅसिफिकच्या दिशेने गेले. उत्तर कोरियाने गुरुवारी सकाळी हवाई क्षेपणास्त्रांची चाचणी केली. यावर जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा म्हणाले की, त्यापैकी एक आंतरखंडीय क्षेपणास्त्र असू शकते.

**उत्तर कोरियाच्या क्षेपणास्त्रांमुळे टोकियोमध्ये चिंतेचे वातावरण**

या संदर्भात माध्यमांशी बोलताना जपानचे पंतप्रधान किशिदा म्हणाले की, यावेळी डागलेल्या क्षेपणास्त्रांपैकी एक ICBM असू शकते, त्यामुळे मी पुन्हा एकदा संरक्षण मंत्रालयाला संबंधित माहिती मिळवून त्याचे विश्लेषण करण्याचे निर्देश दिले आहेत.

### उत्तर कोरियाने पूर्व समुद्राच्या दिशेने ICBM केला गोळीबार

**योनहॅप वृत्तसंस्थेने गुरुवारी दिलेल्या वृत्तानुसार, उत्तर कोरियाने पूर्व समुद्राच्या दिशेने एक आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्र (ICBM) आणि दोन कमी पल्ल्याची क्षेपणास्त्रे डागली आहेत. दक्षिण कोरियाच्या लष्कराने सांगितले की, प्योंगयांगच्या सुनान भागातून सकाळी 7 वाजून 40 मिनिटांनी ICBM डागण्यात आले. या प्रक्षेपणामुळे 2022 मध्ये ICBM ची देशातील सातवे गोळीबार असल्याचे नमूद केले आहे. उत्तर कोरियाच्या क्षेपणास्त्रांमुळे टोकियोमध्ये चिंतेचे वातावरण आहे. यासंदर्भात जपानमध्ये अलर्ट सुद्धा जारी करण्यात आला आहे.**

# धोंडी चंप्या: एक प्रेम कथा' १६ डिसेंबरला होणार प्रदर्शित




**मुंबई ।** रिलायन्स एंटरटेनमेंट आणि सुनील जैन प्रस्तुत ज्ञानेश भालेकर दिग्दर्शित 'धोंडी चंप्या: एक प्रेम कथा' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख नुकतीच सोशल मीडियावर जाहीर करण्यात आली असून येत्या १६ डिसेंबर रोजी 'धोंडी चंप्या' ही रेडा आणि म्हशीची अनोखी प्रेमकहाणी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. कल्ट डिजिटल यांच्या सहकार्याने, फिफ्थ डायमेन्शन आणि कल्ट डिजिटल निर्मित या धमाल चित्रपटाच्या माध्यमातून एक आगळीवेगळी प्रेमकहाणी पाहायला मिळणार आहे. प्रभाकर भोगले यांच्या कथेद्वारा प्रेरित होऊन बनवलेल्या या चित्रपटाचे कथा, पटकथा, संवाद ज्ञानेश भालेकर आणि सागर केसरकर यांनी लिहिले असून यात भरत जाधव, वैभव मांगले हे विनोदाचे दोन बादशाह प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. यांच्यासोबत सायली पाटील आणि निखिल चव्हाण हे सुद्धा मुख्य भूमिकेत दिसतील.

पोस्टरमध्ये धोंडी आणि चंप्या दिसत असून या दोघांमध्ये फुलणारी प्रेमकथा यात पाहायला मिळणार आहे. पोस्टरवरून हा एक धमाल विनोदी चित्रपट असल्याचे दिसत आहे.

या चित्रपटाबद्दल दिग्दर्शक ज्ञानेश भालेकर म्हणतात, "सर्व वयोगटांसाठी असलेला हा एक कौटुंबिAक चित्रपट आहे. धोंडी आणि चंप्या यांचे प्रेम सफल होण्यासाठी त्यांचे मालक त्यांना मदत करणार की, त्यांच्या प्रेमकथेत आणखी काही ट्विस्ट येणार, हे चित्रपट प्रदर्शित झाल्यावरच कळेल."

या चित्रपटातील गाण्यांना सौरभ दुर्गेश यांनी संगीत दिले असून गुरु ठाकूर, मंदार चोळकर, गणेश निगडे यांनी ही गाणी शब्दबद्ध केली आहेत. तर या गाण्यांना अवधूत गुप्ते, वैशाली सामंत, सनाह मोईडुट्टी, सौरभ शेट्ये यांचा आवाज लाभला आहे. सुनील जैन, आदित्य जोशी, व्हेनिसा रॉय, आदित्य शास्त्री निर्मित या चित्रपटाचे अमित अवस्थी, सुशांत वेंगुर्लेकर सहनिर्माते आहेत.

## सिद्धार्थ मल्होत्रा-कियारा अडवाणीची लगीनघाई?



बॉलिवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि अभिनेत्री कियारा अडवाणी रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून रंगल्या आहेत. या दोघांनाही पार्टी, सार्वजनिक ठिकाणी अनेकदा एकत्र स्पॉट करण्यात आलं आहे. आता कियारा-सिद्धार्थ लवकरच विवाहबंधनात अडकणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. बॉलीवूडमधील सिद्धार्थ-कियारा ही लोकप्रिय जोडी लग्नासाठी योग्य ठिकाणाच्या शोधात असल्याची माहिती मिळत आहे. पिंकविलाने दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ-कियारा गेल्या एका महिन्यापासून लग्नासाठी ठिकाण शोधत आहेत. चंदीगडमधील ओबेरॉय सुखविलास स्पा अण्ड रिसॉर्ट या आलिशान हॉटेलला संपर्क केला आहे. बॉलिवूड अभिनेता राजकुमार रावने पत्नी पत्रलेखासह याच हॉटेलमध्ये लग्नगाठ बांधली होती. सिद्धार्थ-कियारा चंदीगड आधी गोव्यात त्यांच्या शाही विवाहसोहळ्याचे प्लॅनिंग करत होते. परंतु, सिद्धार्थ मल्होत्राचा मोठं पंजाबी कुटुंब पाहता ते आता चंदीगडमधील आलिशान हॉटेलमध्ये लग्न करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## आलियाच्या होणाऱ्या बाळासाठी दीपिका उत्सुक




या दोघींमधील इतकं चांगलं बॉण्डिंग हा सध्या नेटकऱ्यांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे.

अभिनेत्री दीपिका पदुकोण ही तिच्या आगामी चित्रपटांमुळे सध्या खूपच चर्चेत आहे. या यादीतील एक चित्रपट म्हणजे 'पठाण.' काल शाहरुखच्या वाढदिवसानिमित्त चित्रपटाच्या निर्मात्यांनी चित्रपटाची पहिली झलक लोकांसमोर आणली. या ॲक्शनपटात शाहरुख खान, दीपिका पदुकोण आणि जॉन अब्राहम हे तिघे महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाचा टीझर लोकांना खूप आवडला आहे. हा टीझर यूट्यूबवर पहिल्या क्रमांकावर ट्रेंड करत आहे. दरम्यान, या चित्रपटावर चाहत्यांबरोबरच सेलिब्रिटींच्याही प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. पण या सागळ्यात आलिया भट्ट आणि दीपिका पदुकोण यांच्या केमिस्ट्रीने लक्ष वेधले आहे.

## 'बॉयकॉट' ट्रेंडचा 'पठाण'ला बसणार

'बॉयकॉट बॉलिवूड' सध्या सोशल मीडियावर सर्वात जास्त व्हायरल होणारा हॅशटॅग आहे. ज्या बॉलिवूडने एकेकाळी हाऊसफुलच्या पाट्या बघितल्या आहेत, त्याच बॉलिवूडला



रिकाम्या खुर्च्या बघाव्या लागत आहेत. 'लाल सिंग चड्डा', 'रक्षा बंधन', 'दोबारा', 'बच्चन पांडे', 'ब्रह्मास्त्र, 'लायगर', अशा अनेक बिग बजेट चित्रपटांवर प्रेक्षकांनी बहिष्कार घातला. 'ब्रह्मास्त्र' सोडल्यास कोणताही चित्रपट चांगली कमाई करू शकला नाही. आता शाहरुख खानच्या आगामी 'पठाण' चित्रपटावर बहिष्कार घालण्याची मागणी नेटकऱ्यांकडून केली जात आहे. काल बॉलिवूडचा किंग खान शाहरुखचा काल वाढदिवस झाला. यानिमित्त शाहरुखच्या चाहत्यांना खास भेट मिळाली. ती म्हणजे बहुप्रतिक्षित 'पठाण' या चित्रपटाचा टीझर काल प्रदर्शित झाला. बऱ्याच दिवसांपासून चाहते या टीझरची वाट पाहत होते. पण शाहरुखच्या वाढदिवसानिमित्त चित्रपटाच्या निर्मात्यांनी चित्रपटाची पहिली झलक लोकांसमोर आणली. किंग खानच्या या ॲक्शनपटात दीपिका पदुकोण आणि जॉन अब्राहम देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाचा टीझर लोकांना खूप आवडला आहे. मात्र काहींनी या चित्रपटाला विरोध दर्शवला आहे.

## "गैरी" चित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर लाँच

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत पण त्या गरजा माणूस जिवंत असेल तर आहेत... माणूस जिवंतच नसेल तर? त्याला कोणती गरज भासेल...? याचा विचार करायला लावणारा चित्रपट म्हणजे "गैरी..." अभिनेता मयुरेश पेम आणि अभिनेत्री नम्रता गायकवाड या नव्या जोडीची केमिस्ट्री "गैरी" या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. दमदार स्टारकास्ट असलेला हा चित्रपट येत्या १६ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे. युक्ता प्रॉडक्शन्स आणि द्विजराज




फिल्म्सचे निर्माते प्रवीण बालाप्रसादजी बियाणी, दत्तात्रय जाधव यांची निर्मिती असलेल्या "गैरी" या चित्रपटाचं लेखन, दिग्दर्शन पांडुरंग बाबुराव जाधव यांनी केलं आहे. मयूरेश पेम, नम्रता गायकवाड, प्रणव रावराणे, आनंद इंगळे, केतन पवार, समीर खांडेकर, सुनील देव, कृतिका गायकवाड, देविका दफ्तरदार यांच्या चित्रपटांत भूमिका आहेत. गुरु ठाकूर आणि विष्णु थोरे यांनी गीत लेखन, अमितराज यांनी संगीत दिग्दर्शन, फुलवा खामकर यांनी नृत्य दिग्दर्शन केलं आहे. वैशाली सामंत, अमितराज, मधुरा कुंभार, हृषिकेश शेलार यांनी गाणी गायली आहेत. तर पार्श्व संगीत आणि संगीत मयूरेश केळकर यांचं आहे. विनोद पाटील यांचं छायालेखन आहे. स्वतःच्या समाजाला वाचवण्यासाठी डॉक्टर होऊ पाहणाऱ्या तरुणाला येणाऱ्या समस्या "गैरी" हा चित्रपट मांडतो. सकस कथा, दमदार स्टारकास्ट असलेल्या या चित्रपटाविषयी आता उत्सुकता निर्माण झाली आहे.

## इफ्तिखार अहमदने लगावला सुपर-१२ टप्प्यातील सर्वात लांब षटकार



**मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा फलंदाज इफ्तिखार अहमदने गुरुवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी-२० विश्वचषक २०२२ च्या सुपर-१२ टप्प्यातील सर्वात मोठा षटकार ठोकला. लुंगी एनगिडीच्या षटकात त्याच्या बॅटमधून १०६ मीटर लांब षटकार आला. ऑस्ट्रेलियात सुरु असलेल्या या स्पर्धेत सर्वात मोठे षटकार लगावणाऱ्या फलंदाजांबद्दल बोलायचे तर इफ्तिखार अहमद या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. या यादीत शीर्षस्थानी यूएईचा जुनैद सिद्दीकी आहे. ज्याने श्रीलंकेविरुद्ध पहिल्या फेरीत १०९ मीटर लांब षटकार लगावला आहे.या विश्वचषकात सर्वाधिक लांब षटकार ठोकणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तीन ऑस्ट्रेलियन खेळाडू आहेत, पण या यादीत एकाही भारतीयाचे नाव नाही. टॉप १० मधील सर्वात लहान षटकार ९८ मीटरचा आहे, जो मायकेल जोन्स, मार्कस स्टोइनिस आणि लॉर्कन टकर यांनी लगावले आहेत.

### टी-20 विश्वचषक 2022 मध्ये सर्वाधिक लांब षटकार ठोकणारे टॉप 10 फलंदाज

जुनैद सिद्दीकी (यूएई) – १०९ मीटर विरुद्ध श्रीलंका, इफ्तिखार अहमद (पाक)- १०६ मीटर विरुद्ध दक्षिण आफ्रिका, ओडियन स्मिथ (वेस्ट इंडिज) – १०६ मीटर विरुद्ध आयर्लंड, डेव्हिड मिलर (दक्षिण आफ्रिका) – १०४ मीटर विरुद्ध भारत, रोव्हमन पॉवेल (वेस्ट इंडिज) – १०४ मीटर विरुद्ध झिम्बाब्वे, मिचेल मार्श (ऑस्ट्रेलिया) – १०२ मीटर विरुद्ध आयर्लंड, ऍरॉन फिंच (ऑस्ट्रेलिया) – १०२ मीटर विरुद्ध न्यूझीलंड, मायकेल जोन्स (स्कॉटलंड) – ९८ मीटर विरुद्ध आयर्लंड, मार्कस स्टॉइनिस (ऑस्ट्रेलिया) – ९८ मीटर विरुद्ध श्रीलंका, लॉर्कन टकर (आयर्लंड) – ९८ मीटर विरुद्ध ऑस्ट्रेलिया

# ...तर पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका उपांत्यफेरीत!

## पाकिस्तानच्या विजयाने भारताचं टेन्शन वाढलं

**मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेला मोठ्या फरकाने पराभूत केलं आहे. आज झालेल्या सामन्यामध्ये पावसाने व्यत्यय आणल्याने पाकिस्तानला अप्रत्यक्षपणे फायदा झाला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना पाकिस्तानने डकवर्थ-लुईस-स्टेन पद्धतीने ३३ धावांनी जिंकला. या विजयामुळे पाकिस्तानचं स्पर्धेतील आव्हान कायम असून भारताचं मात्र टेन्शन वाढलं आहे. बुधवारी बांगलादेशाचा संघर्षपूर्ण लढतीत ५ धावांनी पराभव करत उपांत्यफेरीतील मार्ग सुखकर केला असला तरी नेट रन रेटच्या बाबतीत भारत पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेहून मागे आहे. दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तान सामन्यानंतर भारत दुसऱ्या गटामध्ये अव्वल स्थानी असला तरी उपांत्यफेरीमध्ये कोणता संघ जाणार हे अद्याप निश्चित झालेलं नाही. त्यातच पाकिस्तानच्या या मोठ्या विजयामुळे या गटातील चुरस अधिक वाढली आहे.

पाकिस्तानने निर्धारित २० षटकांमध्ये १८५ धावांपर्यंत मजल मारल्यानंतर धावांचा पाठलाग करणारा दक्षिण आफ्रिकेचा संघ अगदी सहाव्या षटकापर्यंत डकवर्थ-लुईस-स्टेन पद्धतीच्या आकडेमोडीनुसार आघाडीवर होता. मात्र नंतर एकामागोमाग पडलेल्या विकेट्स आणि पावसामुळे सामना १४ षटकांचा खेळवायला लागल्याने दक्षिण आफ्रिकेचा पराभव झाला. पावसामुळे काही वेळ खेळ थांबल्यानंतर पुन्हा खेळाडू मैदानावर उतरले तेव्हा डकवर्थ-लुईस-स्टेन पद्धतीनुसार दक्षिण आफ्रिकेसमोर पाच षटकांमध्ये ७३ धावांचं आव्हान ठेवण्यात आलं होतं. मात्र ३० चेंडूंमध्ये दक्षिण आफ्रिकेला यापैकी ४० धावाच करता आल्या. पाकिस्तानी गोलंदाजांनी टिचून गोलंदाजी केली आणि वेगाने धावा करण्याच्या प्रयत्नात दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा डाव गडगडल्याचं दिसून आलं.

या सामन्यानंतर गुणतालिकेमध्ये पाकिस्तानने दोन स्थानांनी झेप घेतली असून पाकिस्तान या विजयासहीत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. तर पराभूत झालेला दक्षिण आफ्रिकेचा संघ आहे त्याच ठिकाणी म्हणजे दुसऱ्या स्थानी आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही